REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २४ मे, १९४४ अंक २१

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

विनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅबिलेट्स
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखाः—
माणिक चौक, अहमदनगर

★

हेड ऑफिसः—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंटप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, व इतरही ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

मॅनेजर—एच्. ए. करीमभाई

पुण्यांतील
## आदर्श निवासस्थान व भोजनालय
## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

**भांडवल**

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ५,००,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही. जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

# विविध माहिती

### अन्नमहागाई निदर्शक आकडे

| | | |
|---|---|---|
| २६ ऑगस्ट, १९३९ | = | १०० |
| १-४-१९४४ | = | २३१·८ |
| ६-५-१९४४ | = | २३१·४ |

### चीनमध्यें सोन्याचा भाव तोळयास १३०० रुपये

चीनमधील चलनाची किंमत पार नाहींशी झाली आहे. मजुराच्या खाण्यापिण्याचा व रहाण्याचा मासिक खर्च ६५० रुपये येतो. १३०० रुपयांस एक तोळा या दरानें चिनी सरकार सर्रास सोनें विकीत आहे. एक पौंडास ८० चिनी डॉलर, अशी खरी हुंडणावळ आहे, परंतु काळ्या बाजारांत एक पौंडास ७२० चिनी डॉलर द्यावे लागतात.

### दोन महिन्यांत लाचलुचपतीचे ११ प्रकार

रेल्वेवरील लाचलुचपतीचे संबंधांत खटले भरले त्यांपैकीं '११ प्रकरणांत मार्च व एप्रिलमध्यें आरोपींस शिक्षा मिळाल्या, असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

### व्हाइसरॉयसाठी रेशनकार्ड

दिल्लीमध्यें रेशनिंगला प्रारंभ होणार असल्याकारणानें, व्हाइसरॉय, लेडी वेव्हेल व त्यांची कन्या ह्या तिघांच्या नांवाचीं रेशन कार्डें देण्यांत आलीं आहेत.

### " नांगर व पंप आम्ही घेऊं "

एक एकरांत हातानें चालवितां येण्याजोगे नांगर ग्रेट ब्रिटननें युद्धानंतर हिंदुस्थानांत पाठवले, तर त्यांचा लाखांवारी खप होईल, असें सर फिरोजखान नून ह्यांनीं शेतीविषयक यंत्रें करणाऱ्या ब्रिटिश कारखानदारांच्या प्रतिनिधींस सांगितलें. त्याचप्रमाणें, १५ फुटांतील पाणी खेचणारे लहान पंपहि हिंदुस्थानांत पुष्कळ खपूं शकतील, अशीहि त्यांनीं माहिती दिली.

### बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजला किर्लोस्कर बंधु लि. ची देणगी

वरील कंपनीस ३१ जुलै, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ६½ लक्ष रुपये नफा झाला. त्यांपैकीं ३ लक्ष रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येतील. बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजला १० हजारांची देणगी देण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

### दिल्ली शहरांत रेशनिंग

दिल्ली शहरांत २९ मे पासून गहूं, तांदूळ व साखर ह्यांच्या रेशनिंगला प्रारंभ होणार आहे.

### पायतणांवर नियंत्रण

कातड्याच्या कमाल किंमती सरकारनें निश्चित करून टाकल्या, तरी पायतणांचे उत्पादक भारी किंमतीनें कातडें खरेदी करतात व कातड्याच्या किंमतीचें नियंत्रण प्रभावी होत नाहीं. पायतणांच्या किंमती नियंत्रित करण्याचें सरकारनें आतां ठरविलें आहे.

### " खंड-उसनवार " कायदा

खंड-उसनवार कायद्याचें आयुष्य आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आलें आहे. विधिमंडळाच्या पूर्वसंमतीशिवाय अध्यक्षांनीं युद्धोत्तर लष्करी अथवा आर्थिक भानगडी उत्पन्न करणारें कृत्य करण्याकडे ह्या कायद्यानें दिलेल्या अधिकाराचा उपयोग करूं नये अशी प्रस्तुत कायद्यांत तरतूद केलेली आहे.

# शेअर-बाजार

( श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम ).

१९ मे च्या क्रॉनिकलच्या अंकांत ( सर ) होमी मेहतांचें एक खळबळ उडविणारें पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांनीं कापडाचे भाव खालीं जात असून, गिरण्यांना अनेक कारणांनी १९४४ सालीं १९४३ च्या पन्नास टक्के कमी नफे होतील असें भविष्य वर्तविलें आहे. त्याबरोबरच सध्यां गिरण्यांच्या शेअर्सचे भाव वर आहेत त्यांतून गुंतविणारांनीं विकून मोकळें व्हावें व लफंग्यांच्या नादाला लागू नये असा गंभीर इशारा दिला आहे.

वास्तविक गिरण्यांचे भाव सध्यां बरेच मंदींत आहेत. बरेच दिवसांत सुधारणा न दिसल्यानें लोक साशंक असतांना सर होमी मेहतासारख्यांच्या पत्रानें घबराट उत्पन्न होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी गिरण्यांचे भाव भराऱ्या मारत असतांना व ज्या कापसाचा भाव वर आहे म्हणून नफे कमी होणार त्या कापसाचा भाव शिखरांवर असतांना सर साहेबांना अशी चेतवणी देण्याची बुद्धि कां झाली नाहीं हें समजत नाहीं. सरकारच्या कराच्या कडक आकारणीमुळें व कापडाचे आणि सुताचे भाव नियंत्रित असतां नफे कमी होणार हें बाजाराला आजच मुद्दाम सांगण्याचें कारण नाहीं. मागील वर्षीच याबद्दलचे वटहुकूम निघालेले आहेत व या वर्षीही अंदाजपत्रकांत आलेल्या करभरणीच्या पद्धतीमुळें कमी होणारे नफे सर्वांनाच समजत होते व त्या बेतानें गिरण्यांच्या शेअर्सचे भाव खालीं येऊन मंद पडले होते. मागील वर्षी १५ मे ला जरीलाचा भाव ( मे ) ६२२ रु. होता व या वर्षी ४१९ रु. इतका पडला आहे याच प्रमाणांत बाकीच्या कपाशीचे भाव पडलेले आहेत व याखाली भाव जाऊं देऊं नये म्हणून सरकार मध्यें केव्हां पडणार याची रुई बाजार वाट पहात आहे. इतके भाव खाली असतांना गिरण्यांचे या कारणानें नफे वाढावयास हवेत कां पडावयास पाहिजेत हें सर साहेबानींच सांगावें. विशिष्ट मर्यादेखालीं रुईचे भाव आपण पडूं देणार नाहीं असें सरकारनें जाहीर केलेलें आहे व ती मर्यादा पोहोंचली आहे.

इकडे पुष्कळ गिरण्यांनीं सरकारकडे सक्तीनें ठेवी ठेवल्या जात आहेत म्हणून वेगळा घसारा टाकला नाहीं व व्याजें पूर्वीच्या सहामाही इतकींच वाटलीं व कांहींनीं तर वाढवलीं सुद्धां. लवकरच सिंप्लेक्सचें व्याज येणार असून तें मागील वर्षाइतकेंच कायम येणार अशी बातमी आहे. तेव्हां जसजशीं नवीं व्याजें जाहीर होतील व तीं वेळोवांकडीं कमी नाहींत हें एकदां गुंतविणारांच्या नजरेस आलें म्हणजे सध्या घबराट माजविणारांचीं तोंडें बंद पडतील. सर्व गिरण्यांच्या ताळेबंदी परिस्थितींत दोन वर्षांत जमीनअस्मानाचा फरक पडला असून सक्तीच्या परत केल्या जाणाऱ्या ठेवींमुळें एकंदर गिरण्यांच्या धंद्याला विशेष मजबुती आलेली आहे. तसेंच मद्रास कलकत्ता हे बाजार टिकून असून हळूं हळूं वर जात आहेत. तेव्हां सर होमींचें हें पत्र म्हणजे एकादी जाणून बुजून सोडलेली ' पुडी ' तर नव्हेना असा दाट संशय येतो. नाहींतर भागीदारांना तुमच्या शेअर्सचे भाव टिकून राहतील, तुमच्या संस्थांना मजबुती आलेली आहे व पैशाचा प्रचंड दाब आहे इत्यादि आश्वासनें देणारे मेयर समून, इंडिया युनायटेड अपोलो इत्यादींचे अध्यक्ष व शेअर बाजाराचे निःपक्षपाती अध्यक्ष श्री. श्रॉफ हे वेडे तरी समजले पाहिजेत.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १६२ |
| २ "एकॉनॉमिस्ट"चें तर्कट | १६३ |
| ३ प्रॉमिसरी नोटीचा स्टँप | १६४ |
| ४ स्फुट विचार ... | १६५ |
| चुकीची कबुली—उद्योगधंद्यांच्या वृत्तपत्रीय जाहिराती—जंगलें, लांकूड आणि शोषण | |
| ५ ट्रस्टची ठेव रकम व बँक | १६६ |
| ६ इंग्रजांचें अप्रेतत्व ... | १६६ |
| ७ जर्मनी व जर्मनव्याप्त युरोप ... | १६६ |
| ८ उपायांत ढिलाई नको... | १६६ |
| ९ स्टर्लिंग बॅलन्सेस आणि आर्थिक पुनर्घटना ... | १६७ |
| १० "अधिक धान्य आयात करा" ... | १६७ |
| ११ गव्हाचा तुटवडा ... | १६७ |

# अर्थ

बुधवार, ता. २४ मे, १९४४

## "एकॉनॉमिस्ट" चें तर्कट

बिर्ला-टाटा पंचदशवार्षिक योजनेनें ब्रिटिश पत्रें गोंधळून गेल्यासारखीं दिसतात. हिंदुस्थानच्या दारिद्र्यावर ह्या योजनेसारखा तोडगा उपयोगांत आल्यावांचून कार्यभाग व्हावयाचा नाहीं हें त्यांस दिसतें. त्याचप्रमाणें युद्धोत्तर काळांत करावयाच्या पुनर्घटनेंत हिंदुस्थानांतील सरकारानें प्रचंड प्रमाणावर आर्थिक अभिवृद्धीचा प्रयत्न करणें ह्या मागसलेल्या देशांत अपरिहार्य आहे, असेंहि त्यांची मनोदेवता त्यांस सांगत असली पाहिजे. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानास स्वातंत्र्य देण्यास ग्रेट ब्रिटननें स्वतःस बांधून घेतलें आहे आणि स्वतंत्र हिंदुस्थानचें आर्थिक धोरण काय बनेल व त्याचे परिणाम ब्रिटिश व जागतिक आर्थिक घटनेवर कोणत्या प्रकाराचे होतील ह्याची त्यांस कल्पना येत नाहीं. ह्या देशांत आधुनिक धंद्यांची स्थापना झाल्यास त्यांची स्पर्धा ब्रिटिश कारखान्यांस भोंवल्यावांचून रहाणार नाहीं अशी भीतिहि त्यांस वाटते. ह्या भूमिकेवरून ते बिर्ला-टाटा योजनेकडे पहात असल्यानें त्यांची टीका मनोरंजक झाली आहे. इंग्लंडमध्यें "एकॉनॉमिस्ट" साप्ताहिकास आर्थिक प्रश्नांच्या चर्चेत अत्यंत महत्त्वाचें स्थान दिलें जातें आणि त्या पत्राचे विचार शास्त्रीय व अधिकारयुक्त असतात अशी सामान्य समजूत आहे. योजनात्मक आर्थिक धोरणाचा पुरस्कार हिंदी धंदेवाले जोरानें करीत असतां आणि हें धोरण यशस्वी होण्यास राष्ट्रीय वृत्तीचें मध्यवर्ती सरकार स्थापन होणें अगत्याचें आहे असा आग्रह ते करीत असतां महात्मा गांधींची सुटका झाल्यानें "एकॉनॉमिस्ट" च्या विचारांत विलक्षण गोंधळ उडाला असल्याचें त्या पत्रांतील अलीकडच्या एका अग्रलेखावरून दिसतें.

केवळ प्रकृतीच्या कारणासाठीं महात्मा गांधींची मुक्तता करण्यांत आली असली तरी तिच्या मागें मोठें राजकारणहि आहे असें "एकॉनॉमिस्ट"ला वाटत आहे. कोट्यवधि हिंदी लोकांस महात्माजी वंद्य आहेत आणि ही त्यांची भावना पुढेंहि अबाधित राहील. तथापि, राष्ट्रीय जीवनाचें पुढारीपण त्यांचे हातांतून हिरावून घेऊन स्वतः बळकावण्याचा डाव बिर्ला-टाटा कंपूनें टाकला आहे असें त्याचें म्हणणें आहे. ह्या धंदेवाल्यांच्या योजनेंत असलेले दोष त्यानें दाखवले आहेत. ती योजना जशीच्या तशी हिंदुस्थानांत कोणीच मान्य केलेली नाहीं, आणि तिच्यांतलीं वैगुण्येंहि टीकाकारांनीं दर्शविलीं आहेत. चर्चेसाठीं तयार केलेला एक आराखडा आणि आर्थिक उन्नतीचें अंगुलि-दर्शन एवढेंच महत्त्व ह्या योजनेस अनेकांनीं दिलें आहे. परंतु "एकॉनॉमिस्ट"च्या लेखकाचा रोख मुख्यत्वेंकरून योजनेच्या अदृश्य राजकीय दृष्टिकोनाकडे आहे. बिर्ला-टाटा योजना अगडबंब तर आहेच; पण तिच्या मुळाशीं सामाजिक आर्थिक जीवनाचें कडक नियंत्रण आहे आणि त्याबरोबरच लोकांच्या पाठिंब्यावर आधारलेली शक्तिमान् राजसत्ता व वैयक्तिक स्वातंत्र्याचें सग्रास ग्रहण ह्या गोष्टी गृहीत आहेत असें सार ह्या साप्ताहिकानें काढलें आहे. ह्याच्याहिपुढें जाऊन तें म्हणतें कीं, ह्याचाच अर्थ जर्मनी किंवा रशिया ह्या देशांतील झोटिंगशाहीची स्थापना असा आहे आणि ती होणें शक्य किंवा इष्ट आहे हा प्रश्न हिंदुस्थानापुढें आहे. लोकशाहीची चाड असलेल्या हिंदी पुढाऱ्यांची बिर्ला-टाटा योजनेमुळें झोपमोड होत आहे आणि उदारमतवादित्वाचा कंटाळा आलेल्या इतरांस ती पसंत पडली आहे असा शोध "एकॉनॉमिस्ट"नें लावला आहे. योजनाकर्त्यांच्या सद्धेतूविषयीं त्यास शंका नाहीं आणि युद्धपरिस्थिति त्यांस अनुकूल आहे हेंहि त्यानें दाखवलें आहे. तथापि हिंदी राजकारणाचें पुढारीपण स्वतःकडे घेऊन त्यास नवीन वळण लावण्याचा आणि जुन्या लोकशाहीच्या कल्पनांचे जागीं झोटिंगशाहीची प्रस्थापना करण्याचा त्यांचा बेत आपण उघडकीस आणल्याची भूमिका त्यानें घेतली आहे.

आर्थिक नियोजनाचा नवीन जमाना महात्मा गांधींच्या तत्त्वांशीं विसंगत आहे आणि त्यांच्या नैतिक व समाधानी वृत्तीच्या ध्येयाच्या विरुद्ध आहे; त्यांस अप्रिय असलेला जडवाद आणि ऐहिक सुखाविषयीं लालसा ह्यांचा त्यांत विजय होत आहे. हिंदुस्थानाची परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून आर्थिक उन्नति होण्याऐवजीं राजसत्ताधिष्ठित भांडवलशाही बिर्ला-टाटा योजनेंतून बाहेर पडणार आहे असा "एकॉनॉमिस्ट" चा कयास आहे; आणि ह्या आपत्तीपासून हिंदी जनतेचें रक्षण कसें करावें ह्याची चिंता त्यास लागली आहे. लोकशाहीचे हिंदुस्थानांतील भोक्ते आपल्या भांडवलवाल्या बांधवांनीं योजलेली जनतेची पिळवणूक हाणून पाडण्यासाठीं आणि त्यांनीं अमेरिकन भांडवलवाल्यांशीं सूत बांधून त्यांच्या सहायानें स्वतःचा डाव साधूं नये म्हणून इंग्लंडचें सहकार्य इच्छित आहेत. त्यांस स्वदेशांत किती वजन आहे ह्याची शंका ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारांस वाटण्यासारखी आहे. तथापि, त्यांनीं ह्या पुढाऱ्यांशीं बोलणीं चालू करावीं अशी "एकॉनॉमिस्ट" ची सूचना आहे. तथापि हिंदी पुढाऱ्यांनीं प्रथम आपले अंतर्गत भेद मोडून टाकले पाहिजेत अशी अट घालण्यांत आली पाहिजे ही मेख त्या पत्रानें मारून टाकलीच आहे. ह्याच अटीवर क्रिप्स योजनेची पुन्हां त्यांच्याशीं चर्चा चालू करावी असें त्याचें आग्रहाचें सांगणें आहे. आपली योजना लोकशाही पद्धतीस अनुसरून निवडलेल्या जबाबदार मंत्रिमंडळानें पार पाडावी अशी पंचदशवार्षिक योजनेच्या कर्त्यांची मागणी आहे ह्या गोष्टीचा त्यास विसर पडला आहे आणि महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयीं प्रेम त्यास उत्पन्न झालें आहे हें तर मनोरंजक आहे. अमेरिकन भांडवलवाल्यांची भीति त्याच्या लेखांतून स्पष्टपणानें डोकावत आहे आणि हिंदी जनते-

च्या हितापेक्षां ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हिताची त्यास अधिक काळजी वाटत आहे असें कोणी म्हटल्यास तें साचित अन्यायकारक होणार नाहीं. "एकॉनॉमिस्ट"चा प्रस्तुत लेख हिंदुस्थानांतील परिस्थितीनें गोंधळलेल्या मनःस्थितीचा द्योतक आहे ह्यांत शंका नाहीं.

## प्रॉमिसरी नोटीचा स्टँप

प्रॉमिसरी नोटीच्या स्टँपाबद्दल नेहमीं घोटाळा उत्पन्न होतो, तेव्हां त्यासंबंधांत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टींची माहिती "न्यायबोध"वरून एके ठिकाणीं खाली दिली आहे.

व्यवहारांत ज्या प्रॉमिसरी नोटा होतात त्यांत साधारणतः 'मागाल त्यावेळीं पैसे देऊं' असा करार केलेला असतो. अशा प्रकारच्या नोटीस लागणारा स्टँप खालीलप्रमाणें:—

(अ) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रुपये अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां.........१ आण्याचा स्टँप.

(ब) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रु. पेक्षां जास्त रकमेची पण १००० रु. अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां.........२ आण्याचा स्टँप.

(क) जेव्हां प्रॉमिसरी नोट १००० रु. पेक्षां जास्त रकमेची असेल, तेव्हां...४ आण्याचा स्टँप. (स्टँप ॲक्ट आर्टिकल ४९).

(१) प्रॉमिसरी नोटीस जो स्टँप लावणेचा असतो तो रेव्हिन्यु तिकिटाच्या रूपांत आपणास विकत मिळतो. कागदावर प्रॉमिसरी नोट लिहून जरूर तितकीं तिकिटें त्यावर डकविणेचीं असतात.

(२) हा स्टँप लावण्याचे बाबतींत महत्त्वाचा नियम पुढें दिला आहे—

प्रॉमिसरी नोटीला नुसता स्टँप लावून कार्यभाग होत नाहीं, तर तो स्टँप रद्द करावा लागतो. प्रॉमिसरी नोट लिहून झाल्यावर ऋणकोनें सही केली, पण ही सही किंवा निशाणी आंगठा स्टँपावर केला नाहीं अगर अन्य तऱ्हेनें प्रॉमिसरी नोटीचा स्टँप रद्द केला नाहीं तर अशी प्रॉमिसरी नोट कायदेशीर होणार नाहीं.

(३) प्रॉमिसरी नोटीचा स्टँप रद्द करणें याचा अर्थ तो स्टँप पुन्हा उपयोगांत आणतां न येईल असें करणें हा होय. प्रॉमिसरी नोटेवर स्टँप चिकटवून त्यावर सही करणें, अगर आंगठेवाल्या ऋणकोचा दस्तूर बांधणें अगर तारीख घालून सहीचीं अद्याक्षरें लिहिणें, अशा तऱ्हेनें स्टँप रद्द करतां येईल.

(४) प्रॉमिसरी नोटीस केवळ योग्य त्या किंमतीचा स्टँप लावल्यानें प्रॉमिसरी नोट कायदेशीर होते अगर पुराव्यांत ग्राह्य होते असें कोणी समजूं नये, तर स्टँप रद्द केल्याशिवाय त्या स्टँपचा उपयोग नाहीं हें लक्षांत ठेवावें. स्टँप रद्द करण्याचा उत्तम उपाय म्हणजे जितके स्टँप असतील त्या सर्वांवर मिळून ऋणकोची सही घेणें अगर आंगठा घेऊन दस्तूर घालणें.

(५) प्रॉमिसरी नोटीस योग्य स्टँप नसेल तर ती नोट पुराव्यांत ग्राह्य होत नाहीं. दस्तांत योग्य स्टँप नसेल तर दंड देऊन तो दस्त पुराव्यांत ग्राह्य करून घेतां येतो, पण प्रॉमिसरी नोटीच्या बाबतींत मात्र कायदा इतका कडक आहे कीं, अपुऱ्या स्टँपावर असलेली प्रॉमिसरी नोट वाटेल तितका दंड देऊनही पुराव्यांत ग्राह्य होत नाहीं.


महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवं.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस — पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां — ॲंटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलमतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:—मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि० पुणें ४.

# स्फुट विचार

## चुकीची कबुली

पंचदशवार्षिक आर्थिक उन्नतीच्या मुंबई योजनेवर भ्रममूलक टीका "एकॉनॉमिस्ट" ह्या प्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिकानें केली आहे, तिचा समाचार आम्हीं आजच्या अग्रलेखांत घेतला आहे. सदरहु योजना कित्येक बाबतींत सदोष असून प्रतिकूल टीकेस पात्र आहे. तथापि इंग्लंडमध्यें तिच्यावर घेतले गेलेले आक्षेप, दीर्घ विचाराअंतीं, समर्थनीय नाहींत असेंहि आढळून येईल ह्यांत शंका नाहीं. असें वाटण्याचें कारण "एकॉनॉमिस्ट"नें प्रथम केलेलीं विधानें मध्यंतरी प्रांजलपणानें परत घेतलीं आहेत हें होय. योजनेविषयींची अपुरी माहिती हातीं आल्याकारणानें तिच्याविरुद्ध एका वेळीं केलेलीं विधानें वस्तुस्थितीस धरून नाहींत, असें त्या पत्रानेंच म्हटलेलें आढळतें. योजनेंत शेतीचें उत्पादन वाढवणें, सामान्य जनतेची रहाणी सुधारणें, खेडेगावीं व लहान उद्योगधंद्यांची उन्नति करणें इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींस योग्य स्थान देण्यांत आल्याचें त्याच्या लक्षांत आलें आहे. प्रेरक शक्ति, वहातुकीचीं साधनें, शेतीस लागणारीं खतें, लोकांच्या रोजच्या जरूरीच्या वस्तू, ह्यांच्या पुरवठ्यास इष्ट तें महत्त्व देण्यांत आलें आहे आणि राष्ट्रीय स्वयंपूर्णता व औद्योगिक संरक्षण हें योजनेचें प्रमुख अंग पूर्वी वाटलें होतें तसें नाहीं अशी "एकॉनॉमिस्ट"ची कबुली आहे. बाहेरचें भांडवल यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी उपयोगांत आणण्याच्याहि विरुद्ध मुंबई-योजनाकर्ते नाहींत. तथापि, औद्योगिक अभिवृद्धींत सरकारचा हात किती राहील आणि खाजगी व्यक्तिगत मालकी किती असेल ह्याचा उलगडा करण्यांत आलेला नाहीं असें त्या पत्राचें म्हणणें आहे. योजनाकर्त्यांची हिंदी राष्ट्रीय दृष्टि आहे आणि जागतिक आर्थिक उन्नतीचा भाग म्हणून त्यांनीं रचना केलेली नाहीं हा तिचा दोष आहे असें म्हणतां येईल कीं काय हा प्रश्नच आहे. "एकॉनॉमिस्ट" ची दृष्टिहि आंतरराष्ट्रीय आहे तितकीच ती ब्रिटिश आहे हें नाकबूल करून चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानचें दारिद्र्य नष्ट करण्यास औद्योगिक विकासाची आवश्यकता आहे आणि ही अभिवृद्धि योजनात्मक पद्धतीनें घडवून आणली पाहिजे हें दुहेरी तत्त्व मान्य झालें पाहिजे. तपशीलाचा — महत्त्वाच्या तपशीलाचा — विचार उरतो आणि त्यासंबंधांत मतभेद होणें स्वाभाविक आहे.

## उद्योगधंद्यांच्या वृत्तपत्रीय जाहिराती

ह्या देशांत गिऱ्हाइकी असणाऱ्या कित्येक ब्रिटिश धंदेवाल्यांच्या युद्धकालीन जाहिराती वाचून आश्चर्य वाटण्यासारखें आहे. ह्या जाहिराती गिऱ्हाइकांस मिळावयाच्या मालाच्या नसून तूर्त माल मिळणें शक्य नाहीं असें सांगणाऱ्या असतात. आपलीं उत्पादक साधनें विशेष जरूरीच्या युद्धसामुग्री बनवण्यांत सर्वस्वी गुंतली असल्याकारणानें सामान्य गिऱ्हाइकांस त्यांचा आवडता व आपणाकडून नेहमी पुरवण्यांत येत असलेला माल सध्या विकत मिळणें शक्य नाहीं; परंतु युद्धपरिस्थिति बदलतांच पूर्वीप्रमाणें आपण स्वतःचा माल पुरवूं लागूं आणि तों पावेतों गिऱ्हाइकांनीं दम धरावा असें ह्या जाहिराती सांगत असतात. आपल्या मालाचें नांव लोकांच्या दृष्टीसमोर रहावें आणि त्याचा खप युद्ध संपतांच पूर्ववत् चालू व्हावा हा ह्या जाहिरातींचा उद्देश असतो. बाजारांत पाठवावयास पुरेसा माल नाहीं, तेव्हां वर्तमानपत्रांतील जाहिरातींवर व्यर्थ खर्च कशाला करा? ह्या विचारानें कित्येक ब्रिटिश धंदेवाल्यांनीं स्वतःचा वृत्तपत्रांतील जाहिरातींचा खर्च कमी केला आहे. दुसऱ्यांचा उत्पादन खर्च युद्धपरिस्थितींत वाढल्यामुळें त्यांनीं ह्या मार्गानें काटकसर केली आहे. हिंदुस्थानांत असलीच प्रवृत्ति दिसून येते. जाहिरात खर्च किती प्रमाणांत मर्यादित करावयाचा हें निरनिराळ्या धंद्यांत त्यांच्या विशिष्ट उत्पन्न-खर्चाच्या व प्रसिद्धीच्या दृष्टीनें निश्चित होणें सहाजिक आहे. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें जाहिरात खर्चांत बेताची काटकसर करणारे धंदे साबण, दंतमंजनें, प्रसाधन सामुग्री, सिनेमा, नाटकें, औषधें व खाद्य व पेय पदार्थ ह्यांच्या संबंधांतले आहेत. बुटांच्या धंद्यानें आपला जाहिरात खर्च वाढवला आहे. पण घरगुती सामान, शिक्षण, सिगारेट्स, नियतकालिकें व वृत्तपत्रें, प्रवास, डोक्यास लावावयाचीं तेलें इत्यादि धंद्यांनीं आपला जाहिरातीवरील खर्च फार मोठ्या प्रमाणांत कमी केला आहे. जाहिरातींचा एकूण खर्च सुमारें छत्तीस कोटि रुपयांचा आठरा कोटि रुपयांवर आलेला आहे. म्हणजे तो जवळ जवळ निम्मा झाला आहे.

## जंगलें, लाकूड आणि शेणखत

शेतांस शेणखताचा पुरवठा न झाल्याकारणानें जमिनीची उत्पादकशक्ति मर्यादित होते आणि शेतीचें उत्पन्न व्हावें तसें न होतां धान्याचें वगैरे उत्पन्न कमी येतें अशी तक्रार ह्या देशांत आज कित्येक वर्षें केली जात आहे. शेणाचा उपयोग खतासाठी करण्याऐवजी गोवऱ्या बनवण्याकडे होतो आणि पिकांस सकस खाद्य मिळत नाहीं. लाकडाच्या जळणाचा तुटवडा असल्यानें गोवऱ्यांस चांगली मागणी येते आणि त्या करून विकणारांस रोकड पैशाची प्राप्ती होते. एका बाजूनें हा होणारा फायदा शेतीच्या उत्पादनाचे दृष्टीनें नुकसानकारक ठरतो. जंगलांचे इन्स्पेक्टर जनरल, सर हर्बर्ट हॉवर्ड, ह्यांनीं असा हिशेब केला आहे कीं शेणाचा उपयोग जळण म्हणून न होतां तें खतासाठी वापरलें गेल्यास हिंदुस्थानांतील एकूण शेतीपैकी पंधरा टक्के जमिनीस चांगलें खत मिळूं शकेल आणि हिंदी शेतकऱ्यांचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत वाढेल. पण सरपणाच्या तुटवड्यामुळें शेणास किंमत येते आणि त्याच्या गोवऱ्या बनवल्या जातात, तो प्रश्न कसा सोडवावयाचा? लाकूड-फाट्याचा पुरवठा खेडेगावांत विपुल व स्वस्त होऊं शकेल तर हा प्रश्न सुटणें अवघड नाहीं. सर हर्बर्ट ह्यांनीं युद्धोत्तर आर्थिक अभिवृद्धीची आपली योजना तयार केली आहे तीमध्यें जंगलांचा विस्तार आणि लाकडाच्या पुरवठ्याची वाढ ह्यांचा अंतर्भाव प्रामुख्यानें करण्यांत आला आहे. प्रत्येक प्रांतांत वीस ते पंचवीस टक्के इतकी वाढ जंगलांच्या क्षेत्रांत व्हावी म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानांत एक लक्ष चौरस मैलांचें नवीन जंगल निर्माण होईल अशी त्यांची सूचना आहे. खेडेगांवांत घरें, शेतीचीं साधनें व जळण ह्यांस लागणारें लाकूड जंगलें पुरवूं शकलीं तर शेणखत शेतांस मिळेल आणि शेतीचें उत्पन्न वाढून जळणाची ददात मिटेल असें त्यांचें म्हणणें आहे. हा प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. हिंदी शेतीचें उत्पादन वाढवण्याचें अगत्य अलीकडे येथील सरकारांस पटलें आहे आणि युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत ह्या प्रश्नास योग्य स्थान देण्यांत आलें आहे. जंगल खात्यांतील अधिकारी आणि नोकर शिकवून तयार करावे लागतील आणि त्यासाठी प्रांतिक सरकारांस जरूर त्या शिक्षणसंस्थांची व त्यांवरील खर्चाची सोय करावी लागेल. हा सर्व उत्पादक स्वरूपाचा खर्च ठरेल ह्यांत शंका नाहीं. जंगल खात्याच्या व जंगलांच्या क्षेत्राचा विस्तार करण्याचा कार्यक्रम युद्धोत्तर काळावर ढकलण्याचें कारण नाहीं. तो उपक्रम त्वरित हातीं घेतला जाणें आवश्यक आहे.

## ट्रस्टची रक्कम ठेव म्हणून स्वीकारणाऱ्या बँकेवरील जबाबदारी

### मद्रास हायकोर्टाचा एक निवाडा.

नायर मॉडर्न बँक लि., पाटकट ह्या बँकेनें त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँक लि. मध्यें ६,५०० रुपये मुदतबंद ठेव म्हणून ठेवले होते. नायर मॉडर्न बँकेनें आपल्या नोकरांकडून जामीनदारीसाठी घेतलेली ही रक्कम होती. अशी रक्कम शेड्यूल्ड बँकेंत एका वेगळ्या खात्यांतच ठेवली पाहिजे, असें कंपनी कायद्याचें २८२ व हें कलम सांगतें व त्याप्रमाणें त्रावणकोर बँकेंत "नोकरांची रोख जामीनदारी" नांवाचें वेगळें खातें नायर बँकेकडून उघडल्यांत आलें होतें. पुढें त्रावणकोर बँक बंद झाली व नायर मॉडर्न बँकेनें तिच्या लिक्विडेटरांवर दावा आणून रकमेची मागणी केली. नायर मॉडर्न बँक ही वरील ६,५०० रुपयांकरितां ट्रस्टी होती व त्रावणकोर बँकेनें हें माहीत असूनच ठेव स्वीकारली, त्या अर्थी त्रावणकोर बँक ही नायर मॉडर्न बँकेच्या नोकरांच्या पैशाचीहि ट्रस्टी झाली, असा वादीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला. त्रावणकोर बँकेच्या लिक्विडेटरांनीं अर्थातच ही भूमिका मान्य केली नाहीं. वादीनें ठेवलेली रक्कम वादीच्या इतर ठेवींपासून अलग राहावी, एवढाच त्या रकमेच्या ठेवीस " नोकरांची रोख जामीनदारी " हें नांव देण्यांत उद्देश होता, असें प्रतिवादीतर्फे सांगण्यांत आलें.

"ठेवीदार हा ट्रस्टी आहे व ठेवलेली रक्कम हा ट्रस्टचा पैसा आहे, एवढ्यानें बँकर व ठेवीदार ह्यांचेमधील नेहमींचें देणेकरी व घेणेकरी हें नातें नाहींसें होत नाहीं; ठेव ही ट्रस्टच्या पैशाची आहे, असें ठेव स्वीकारणाऱ्या बँकेस माहिती करून दिलं तर ट्रस्टीनें ट्रस्टविरुद्ध वर्तन करण्याच्या प्रयत्नांत सामील होऊं नये एवढेंच बँकेवर बंधन आहे." असा ह्या संबंधांत मद्रास हायकोर्टाचा निवाडा झाला आहे. अर्थात्, वादीचा दावा यशस्वी झाला नाहीं.

### जगांतील भाषांत इंग्रजीचें अग्रेसरत्व

जगांतील प्रमुख भाषा व त्या बोलणारांची संख्या ह्यांविषयीं आकडे खालीं दिले आहेत :—

| | कोटि | | कोटि |
|---|---|---|---|
| इंग्रजी | २६ | जपानी | ७½ |
| हिंदुस्थानी | १६ | फ्रेंच | ७ |
| रशियन | १४½ | बंगाली | ६¾ |
| स्पॅनिश | ११½ | इटालियन | ५¾ |
| जर्मन | ९¾ | पोर्तुगीज | ५ |

४० कोटि चिनी लोक मिळून चिनी भाषेचे ९ प्रमुख प्रकार बोलतात. लिपी मात्र सर्व चीनमध्यें एकच आहे.

इंग्रजी भाषेचें प्रभुत्व सर्वत्र आढळतें. ७० कोटि लोकांवरील सरकारांची भाषा इंग्रजीच आहे. जगांतील तीन चतुर्थांश पत्रें इंग्रजींत लिहिलेलीं असतात व निम्मीं वृत्तपत्रें इंग्रजी भाषेंतीलच आहेत. रेडिओवरील कार्यक्रम जाहीर करणारांपैकीं शेंकडा ७५ इंग्रजींतूनच बोलतात. दोनशें वर्षांपूर्वी इंग्रजीचें एवढें प्रस्थ नव्हतें, परंतु व्यापार व वसाहती ह्यांच्या वाढीबरोबर इंग्रजी ही जगाची व्यापारी भाषा बनली. अमेरिकेनें इंग्रजी भाषाच पत्करली, व शास्त्रीय व इतर ज्ञानाच्या फैलावास इंग्रजी भाषेचा प्रसार उपयुक्त होणें क्रमप्राप्तच झालें. इंग्रजी भाषेंत आतां ७,००,००० शब्द आहेत.

## गेल्या वर्षांतील जर्मनी व जर्मनव्याप्त युरोप

जर्मनव्याप्त युरोपचें क्षेत्र लहान झालें असून जर्मनीस सर्व बाजूंनीं स्वतःचा आणि आपल्या शहरांचा अविरत बॉबहल्ल्यांपासून बचाव करावा लागत आहे. युद्धोपयोगी महत्त्वाचे कारखाने पश्चिम जर्मनींतून इतर ठिकाणीं हलवणें भाग पडलें. युरोपांतील शेतीचीं व औद्योगिक उत्पादनाचीं प्रमुख केंद्रें जर्मनीच्या वर्चस्वाखालीं होतीं. जर्मन प्रजाजन व परदेशांतून आणलेले लोक ह्यांवर कामाचा भयंकर ताण पडला. तथापि कच्चा माल, दारूगोळा, शस्त्रास्त्रें, युद्धसाहित्य, इत्यादींचा निर्णायक ठरण्याजोगा तुटवडा दिसून आला नाहीं. हवाईलढाया आणि लोक व लष्कर ह्यांच्या प्रचंड हालचाली ह्यांमुळें उत्पादनास अडथळा आला.

परदेशांतून आणलेल्या कामगारांच्या संख्येंत १९४३ सालीं ४० लक्षांची भर पडली. युद्धकैदी व परदेशी कामगार मोजले तर आतां १ कोटि, २० लक्ष विदेशी कामगार जर्मन प्रभुत्वाखालीं काम करीत आहेत. वर्षअखेर मनुष्यबळावर बराच ताण पडलेला दिसून आला. जर्मनींत व बाकीच्या बहुतेक देशांत रोट्यांचें रेशन वाढवून तें, कांहीं ठिकाणें वगळलीं असतां, युद्धाच्या पहिल्या वर्षांच्या रेशनइतकें करण्यांत आलें. बटाटे व भाज्या ह्यांचें पीक मात्र कमी आलें. कोळसा, लोखंड व पोलाद ह्यांचें उत्पादन टिकून राहिलें. कार्यक्षमतेच्या स्पर्धा व कामांत सुधारणा आणि कच्च्या मालाची बचत ह्यासंबंधांत सूचना मागविणें विशेष जोमानें चालू होतें. १९४३ सालीं जर्मनीनें नवे कर बसविले नाहींत. जर्मन राष्ट्रीय कर्ज मात्र भरमसाट वाढलें. तटस्थ राष्ट्रांकडे निर्गत वाढविण्याची जर्मनीनें शिकस्त केली.

### " प्लेग कमी झाला, म्हणून प्रतिबंधक उपायांत ढिलाई नको "

१९४१ सालाच्या मानानें १९४१ सालीं मुंबई प्रांतांतील मृत्युसंख्या २३,१८९ नें कमी भरली. जनन संख्याहि ३८,३८६ नें कमी भरली. जननाची नोंद व्यवस्थेशीर होत नसल्याकारणानें, वरील आकड्यांवरून विशेष निष्कर्ष काढणें योग्य होणार नाहीं. १९४२ सालीं एकूण ७,२४,७२६ जन्म नोंदले गेले. खेड्यांत व शहरांत जननाचें प्रमाण अनुक्रमें ३६·३७ व २७·३४ असें पडलें. प्लेगनें फक्त ६८० बळी घेतले; १९४१ सालीं ५,३११ लोकांस प्लेगनें मृत्यु आला होता. " १९३६ ते १९३८ ह्या मुदतींत प्लेगचें प्रमाण उतरतें होतें. १९३९ सालीं प्लेगचा फैलाव जास्त झाला व १९४० सालीं त्यानें शिखर गाठलें. १९४१ ह्या वर्षी थोडी सुधारणा झाली. व १९४२ मध्यें तर प्लेग पुष्कळच आटोक्यांत होता. हें उतरतें प्रमाण येतीं कांहीं वर्षें कायम राहील अशी अपेक्षा आहे. परिस्थिति सुधारली, कीं स्थानिक स्वराज्य संस्था प्लेगप्रतिबंधक इलाजांत ढिलाई करतात व त्यामुळें पुनः प्लेगला जोर लागण्यास भूमिका तयार होते आणि एकदम प्लेग वाढलेला दिसतो. " असें सरकारी अहवालांत म्हटलें आहे.

### रेल्वेची वाढती वहातुक

जी. आय. पी. रेल्वेनें १९४२–४३ मध्यें, १९३९–४० च्या मानानें ३३% जास्त मालाची व ३६% जास्त उतारूंची वहातूक केली.

## स्टर्लिंग बॅलन्सेस आणि आर्थिक पुनर्घटना

( ले:—श्री. म. रं. जोग )

युद्धामुळें अनेक तऱ्हेचा पक्का माल इंग्लंडमधून हिंदुस्थानांत यावयाचा थांबला आहे त्यामुळें इंग्लंडला त्याबद्दल द्यावी लागणारी किंमत हिंदुस्थान सरकारला सध्यां द्यावी लागत नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रिटन व अमेरिका हिंदुस्थानांत अनेक तऱ्हेचा पक्का व कच्चा माल खरेदी करीत आहेत त्यामुळें हिंदुस्थानचा कर्ज-बाजारीपणा नष्ट झाला व इंग्लंडलाच आतां हिंदुस्थानचें देणें झालें आहे.

याचा अगदीं लगतचा परिणाम म्हणजे हिंदुस्थान सरकारला दरवर्षी व्याज म्हणून द्यावी लागणारी रक्कम आतां देण्याचें कारण नाहीं. पण या घटनेकडे दुसऱ्या दृष्टीनें अनेक लोक बघत आहेत. हिंदुस्थानांतील प्रमुख आठ औद्योगिक नेत्यांनीं तयार केलेल्या योजनेंत या स्टर्लिंग शिलकेचा विचार केला आहे. सध्यां ही शिल्लक जवळ जवळ साडेसातशें कोटी रुपये आहे व युद्ध संपेपर्यंत ही शिल्लक १ हजारपर्यंत जाईल. वर उल्लेखिलेल्या योजनेंत १० हजार कोटी रुपये खर्च केला जाईल. त्यापैकीं 1/10 भाग ह्या शिल्लकेंतून मिळेल अशी अपेक्षा आज व्यक्त केली जाते.

पण मुख्य प्रश्न असा आहे कीं युद्धोत्तर कालांत ही शिल्लक आतां म्हटल्याप्रमाणें उपयोगांत आणणें शक्य होईल का ? या दृष्टीनें पुढील बाबींचा विचार केला पाहिजे.

( १ ) जसजसें युद्ध हिंदुस्थानच्या जवळ जवळ येऊं लागलें आहे तों तों दोस्तांच्या हिंदुस्थानांतील सैन्यसंख्येंत वाढ होत आहे. जपान्यांना तोंड देण्यासाठीं फारच मोठी रक्कम खर्च होत आहे. हा खर्च कुणी सोसायचा ? यांतील कांहीं भाग तरी निदान हिंदुस्थानसरकारला द्यावा लागेल व तो या स्टर्लिंग शिल्लकेंतून दिला जाईल. यामुळें ही रक्कम कमी होईल.

( २ ) युद्धोत्तर कालांत पौंडाची किंमत कमी होणार हा जणूं काय नियमच ठरून गेला आहे. त्यामुळेंही हिंदुस्थानची स्टर्लिंग शिल्लक कांहीं कमी होईल. पण या बाबतींत ब्रिटनशीं हिंदुस्थान सरकारनें करार करणें योग्य होईल. असा करार अर्जेंटिनानें इंग्लंडशीं केला आहे व या घसाऱ्यामुळें होणारें नुकसान अर्जेंटिनाला सोसावें लागणार नाहीं.

( ३ ) युद्धोत्तर कालांत इंग्लंडनें हिंदुस्थानमधील बाजारपेठ परत मिळवण्याचा चंग बांधला आहे. ब्रिटिश कारखानदारांना तशा तऱ्हेचें आश्वासन मिळालें आहे. त्या दृष्टीनें आतांपासून प्रयत्न सुरू झाले आहेत. आतांपासून उपभोग्य वस्तूंची आयात सुरू केली गेली आहे. याविरुद्ध असेंब्लींतसुद्धां ओरड झाली आहे.

( ४ ) युद्धामुळें प्रत्येक देशांतील कारखाने युद्धोपयोगी माल तयार करीत आहेत. युद्ध संपल्याबरोबर यांचें उत्पादन थांबेल व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न सुरू होतील. पण या गोष्टीला कांहीं काळ लागेल व त्या काळांत उत्पादक वस्तूंसाठीं मागणी फार वाढेल त्यामुळें त्यांच्या किंमती भयंकर वाढतील. हिंदुस्थानच्या औद्योगिक पुनर्घटनेसाठीं लागणारी मशि-नरी हिंदुस्थानला अत्यंत महाग पडेल.

( ५ ) एक वेळ जास्त किंमत द्यावी लागली तरी चालेल, पण ती किंमत देऊनसुद्धां ह्या उत्पादक जिनसा मिळण्याची खात्री देतां येणार नाहीं. त्यासाठीं निरनिराळ्या राष्ट्रांत व्यापारी तह आतांपासून होऊं लागले आहेत. या दृष्टीनें हिंदुस्थान सर-कारनें कोणतीच महत्त्वाची हालचाल केली नाहीं.

ह्या सर्व मुद्यांचा विचार केला तर सहज लक्षांत येईल कीं, सध्यां सांचलेल्या स्टर्लिंग शिलकेवर विसंबून चालणार नाहीं, या शिलकेचा चांगल्या तऱ्हेनें युद्धोत्तर काळांत उपयोग करून घ्यावयाचा असेल तर खालील तीन गोष्टी करणें अत्यंत जरूर आहे.

( १ ) कच्च्या आणि पक्क्या मालाचा ब्रिटनला व इतर दोस्त राष्ट्रांना पुरवठा करतांनाच पौंडाच्या घसाऱ्याचा या कर्जावर कांहीं परिणाम होणार नाहीं अशी हमी मागून घेणें.

( २ ) उपभोग्य वस्तूंची आयात थांबवणें व या आयातीमुळें ही शिल्लक कमी होणार नाहीं, अशी दक्षता घेणें.

( ३ ) उत्पादक वस्तू उत्पादन करणाऱ्या इतर राष्ट्रांबरोबर व्यापारी तह करून युद्धोत्तर कालांत उत्पादक वस्तू आपल्याला मिळतील अशी व्यवस्था करणें.

या तीन गोष्टींचा यशस्वी अवलंब केला तरच या शिलकेचा कांहीं उपयोग होईल. एरवीं नाहीं.

---

### " अधिक धान्य आयात करा "

धान्याविषयक धोरण सुचविणाऱ्या " फूड ग्रेन्स पॉलिसी कमि-टी "नें, धान्याची आयात करून ५ लक्ष टन धान्याचा सांठा तयार करावा व नेहमीची हिंदी मागणी पुरी पाडण्यासाठीं दरसाल १० लक्ष टन धान्याची आयात करण्यांत यावी, अशी शिफारस केली होती. जानेवारी १९४४ अखेरच्या १३ महिन्यांत हिंदु-स्थान सरकारनें फक्त १,६४,००० टन धान्याचीच आयात केली. जीवनोपयोगी इतर वस्तूंच्या आयातीस आगबोटींत जागा देण्यांत येते, ती वास्तविक धान्यास अगोदर मिळाली पाहिजे, व कमि-टीनें सांगितलेल्या आयातीचा आंकडा सरकारनें पुरा केला पाहिजे, असें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीच्या कमिटीनें हिंदुस्थान सरकारास लिहून कळविलें. सध्यां शक्य होईल तेवढी धान्याची आयात आम्हीं करीत आहों, असें त्यास सरकारनें उत्तर पाठविलें आहे.

### गव्हाचा जागतिक तुटवडा ?

" उत्तर अमेरिका खंडांतील येत्या बारा महिन्यांतील शेतीचा सबंद जगांतील लोकांच्या जीवनावर कित्येक वर्षे परिणाम होणार आहे. अमेरिका देश गव्हाची निर्गत करीत असे; तोच आतां रोटीसाठीं नाहीं, परंतु इतर कारणांसाठीं मोठ्या प्रमाणावर त्याची आयात करूं लागला आहे. सध्यांच्या पद्धतीनें गव्हाचा उठाव तेथें चालू राहिला, तर अमेरिकेंतील सांठा संपुष्टांत येऊन त्यास कनेडिअन गव्हावर अवलंबून रहावें लागेल. अर्जेंटिना व ऑस्ट्रे-लिया ह्यांची निर्गत सबंद जगास पुरी पडणार नाहीं व उत्तर अमेरिका खंडांतील सध्यांची प्रवृत्ति थांबविण्याची व्यवस्था करणें हाच गव्हाचा तुटवडा पडूं न देण्याचा उपाय आहे. " मँचेस्टर गार्डिअन पत्रानें वरीलप्रमाणें भयसूचना दिली आहे.

---

### हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न

| | लक्ष रु. |
|---|---|
| एप्रिल १९४३ | २९७ |
| मार्च, १९४४ | ६६३ |
| एप्रिल १९४४ | ४१९ |

## पुना गेस्ट हाऊस

१०७, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )

**टोमॅटो केचप ( गोड ) व**

**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिसः ९१३ अ सदाशिव, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**दत्त कंपनी**

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.